क्रमांक १३५५१/क-३ (लेखा)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई
दि.१८ ऑगस्ट, २०२३

संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र. भनिनि११२३/६६/प्र.क्र.१८/का.१३ अ, दिनांक १८ एप्रिल, २०२३

**:: परिपत्रक ::**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या सेवेतील भविष्य निर्वाह निधी योजना लागू असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना संदर्भाधीन अधिसूचनेच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्य शासकीय वर्गणीदारांची भविष्य निर्वाह निधी वर्गणीची मर्यादा ५ लाखापर्यंत सिमीत ठेवण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

सदर अधिसूचनेनुसार महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ मध्ये सुधारणा करून या नियमांना, महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी (सुधारणा) नियम, २०२३ असे संबोधण्यात येवून ज्याचा निर्देश मुख्य नियम असा करण्यात आला आहे. मुख्य नियमाच्या नियम -८ मध्ये उप नियम (१), खंड (ब) मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त नसेल. तसेच, एका वित्तीय वर्षातील मासिक वर्गणी व थकबाकीसह मिळून येणारी रक्कम आणि वित्तीय वर्षात वसूल केलेले व्याज ही रक्कम रू. ५ लाखापेक्षा अधिक राहणार नाही असे अधिसूचनेत नमूद करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या सेवेतील भविष्य निर्वाह निधी योजना लागू असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांची मासिक वर्गणी मूळ वेतनाच्या ६ टक्के रकमेपक्षा कमी नसेल तसेच, एका वित्तीय वर्षातील मासिक वर्गणी व थकबाकीसह मिळून येणारी रक्कम आणि वित्तीय वर्षात वसूल केलेले व्याज ही रक्कम रू. ५ लाखापेक्षा अधिक राहणार नाही यांची खातरजमा करून भविष्य निर्वाह निधी मासिक वर्गणीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(स्वाती ताडफळे)
उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

याची प्रत :

१) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष
३) संगणक कक्ष